# श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाचा सुवर्ण प्रवास...

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी संचलित श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय आज एक एप्रिल रोजी आपल्या स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे. शिक्षण हा विकासाचा मुलभूत घटक आहे. शिक्षणाच्या गुणात्मक प्रसारासाठी या महाविद्यालयाने गेली पाच दशके केलेले कार्य प्रशंसनीय आहे.

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी ही विदर्भ तसेच महाराष्ट्रातील एक ख्यातीप्राप्त उच्च शिक्षण संस्था आहे. श्री आर.एल.टी. सायन्स कॉलेजने अकोल्याच्या शिक्षण क्षेत्रात ध्येयवादी दृष्टीने शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य केले आहे. गेल्या काही दशकात शिक्षण क्षेत्राला स्पर्धात्मक स्वरूप प्राप्त झालेले असतांना दि बी.जी.ई. शिक्षण संस्थेचे कार्य वेगळेपणाने उठून दिसते. शिक्षण हा समाजाच्या विकासाचा आणि प्रगतीचा पाया आहे त्यामुळे एकूणच अकोल्याचा शैक्षणिक दृष्ट्या विकास साधण्याचे महान कार्य श्री आर.एल.टी. महाविद्यालयाने केले आहे. यावर्षी महाविद्यालय आपला सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. एखादी शिक्षण संस्था स्थापन करणे, चालविणे आणि तिच्या कार्याचा विकास करणे ही काही सोपी गोष्ट नाही. परंतु जिद्द, चिकाटी, परिश्रम करण्याची तयारी आणि समर्पणभाव असेल तर कोणतीही गोष्ट कठीण नाही हे दि बी.जी.ई. सोसायटीने प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले आहे. महाविद्यालयाच्या इतिहासात पन्नास वर्षांना फार मोल आहे. विशेष म्हणजे दि बी.जी.ई. सोसायटीचा इतिहास हा अतूट मैत्रीचा इतिहास आहे.

दि. १४-१-१९३५ साली मकरसंक्रांतीच्या पावन पर्वावर स्व.जी.व्ही. कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली स्व.श्री. बाबुराव जोशी, स्व. एन.आर. केळकर, स्व. आर.के. पागे, स्व. के.एस. जोगळेकर, स्व. आर.बी. मुरकुटे, स्व. आर.व्ही. सोमण व स्व. श्री. एम.आर. श्रीनिवासन या सेवाभावी शिक्षकांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात पाऊल टाकत महाविद्यालयीन शिक्षणाचा श्रीगणेशा केला. तेव्हापासून अकोल्याच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा विषयक इत्यादी क्षेत्रात महाविद्यालयाने आपल्या कार्यकर्तृत्वाने खूप मोलाची कामगिरी बजावली. या मंडळींचे संस्था स्थापनेत महत्वाचे योगदान होते. कोणत्याही राजकीय तसेच आर्थिक भांडवलाचे पाठबळ नसतांना स्वातंत्र्यपूर्व काळात शैक्षणिक क्षेत्रात सामान्यापर्यंत ज्ञानगंगा पोहोचविण्याचे बृहतकार्य नितांत श्रद्धा आणि विलक्षण परिश्रम घेऊन संस्थापन मंडळाने पार पाडल्यामुळे संस्थेचा वटवृक्ष हरितपर्णांनी संपन्न होत बहरत गेला, बहरत आहे.

स्व.श्री. राधाकिसनजी लक्ष्मीनारायणजी तोष्णीवाल यांच्या मोलाच्या दातृत्वातून श्री आर.एल.टी. सायन्स कॉलेज १ एप्रिल १९७० या दिवशी अस्तित्वात आले. प्रथम प्राचार्य होण्याचा मान स्व. म.गो. जोशी सरांना मिळाला. कडक शिस्तीचे प्रणेते म्हणून प्राचार्य स्व. म.गो. जोशी सरांचा नावलौकिक होता. त्यांच्यानंतर प्राचार्य स्व. आर.एम. देशमुख, प्राचार्य स्व.डॉ. बी.एम. फुलाडी, प्र. प्राचार्य डब्ल्यु.जी. नाईकवाडे, प्राचार्य पी.आर. राजनेकर, प्राचार्य डी.व्ही. राजवाडे, प्र. प्राचार्य डी.आर. डोणगांवकर यांच्या नेतृत्वात सतत गुणवत्ता यादीत येणाऱ्या बुद्धिवान विद्यार्थ्यांमुळे आर.एल.टी. कॉलेजचा नावलौकिक महाराष्ट्रात होऊ लागला. गेल्या पन्नास वर्षात महाविद्यालयाने प्रगतीचे अनेक टप्पे पूर्ण केले असून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात महाविद्यालयाने अग्रगण्य असा लौकिक प्राप्त केला आहे. नॅक बंगलोरनी महाविद्यालयास 'अ' दर्जा प्रदान केला आहे. आर.एल.टी. चे प्राध्यापक, शिक्षक, शैक्षणिक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी समाजाच्या विविध अंगांना आपल्या प्रतिभेने व कार्यनिष्ठेने समृद्ध करण्याचे कार्य आजतागायत करीत आहेत. २०१९-२०२० हे महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष.

१४ एप्रिल २०१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी ‘१४ तास अभ्यास विकासाचा ध्यास’ हा प्रथम कार्यक्रम घेण्यात आला. याच दिवशी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त पन्नास वेगवेगळे समाजोपयोगी सांस्कृतिक, क्रीडाविषयक, नाविन्यपूर्ण उपक्रम-कार्यक्रम घेण्याची मुहूर्तमेढ रोवल्या गेली. ह्या सर्व उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी ह्यांच्या प्रमाणेच माजी विद्यार्थी, माजी प्राध्यापक व माजी कर्मचारी ह्यांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. ह्या निमित्ताने समाजाच्या सहभागीतेचेही काही उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले.

समाजपरिवर्तनामध्ये शिक्षकांची भूमिका अतिशय महत्वपूर्ण मानली जाते. शिक्षकांनी काळाप्रमाणे विषयज्ञान वाढवून अद्ययावत ज्ञानाने समृद्ध असणे, नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे व शिक्षण हा व्यवसाय नसून धर्म आहे असे मानून आदर्शत्वाकडे वाटचाल करणारे प्राध्यापक आर.एल.टी. सायन्स कॉलेजला लाभले आहेत.

आर.एल.टी. सायन्स कॉलेज, काय आणि किती वर्णन करावे या महाविद्यालयाचे ! किती विशेषणे लावावी ? क्रीडा क्षेत्रात दबदबा असलेले आमचे आर.एल.टी., वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धात सहभागी होणाऱ्या खेळाडूंची खाण म्हणजे आर.एल.टी., विविध जिल्हा क्रीडा संघटनेचे प्रतिनिधित्व करणारे विद्यार्थी घडविणारे असे आमचे आर.एल.टी., शैक्षणिक क्षेत्रात नेतृत्व प्रदान करणारे महाविद्यालय म्हणजे आर.एल.टी., विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडणारे महाविद्यालय म्हणजे आर.एल.टी., हुशार व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करणारे महाविद्यालय म्हणजे आर.एल.टी., प्रशासनाचा मुख्य आधार हा कायदा वा नियम नसून माणुसकीचा ओलावा हा प्रशासनाचा प्रमुख आधार मानून प्रशासन करणाऱ्या प्राचार्यांचा व संस्था चालकांचा समूह म्हणजे आर.एल.टी., विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय तात्काळ घेणारे महाविद्यालय म्हणजे आर.एल.टी.

आज आर.एल.टी. कॉलेजमध्ये कनिष्ठ महाविद्यालयात ६३५ मुली तर ५४१ मुले शिक्षण घेत आहे. वरिष्ठ महाविद्यालयात १२९३ मुली व ४७९ मुले असे एकूण २९४८ विद्यार्थी पुढील भविष्याच्या वाटचालीची तयारी करीत आहेत.

महाविद्यालयाने ज्ञानक्षेत्रात उंच भरारी घेत विविध विभागांची आणि अभ्यासक्रमांची स्थापना करून ती वृद्धिंगत केली. अत्यंत अभिमान वाटावा असे कर्तृत्वसंपन्न विद्यार्थी घडविलेत. क्रीडा, शिक्षण, कायदा, सहकारिता, पत्रकारिता, संगीत, आरोग्य, साहित्य, नाट्यकला, सामाजिक सेवा, राजकारण, पोलीसदल, नागरी सुरक्षा, रेल्वे सेवा, बॅकींग, वाहतूक, पर्यटन, व्यापार, व्यवसाय, उद्योग, सांस्कृतिक कार्य अशा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांशी संबंधित असलेल्या संस्थांमध्ये विविध स्तरांवर तसेच अत्यंत उच्च पदस्थ माजी विद्यार्थी महाविद्यालयाची फलसंपदा आहे.

महाविद्यालयाच्या वाटचालीत बी.जी.ई. संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. राजीवजी बियाणी, श्री. नंदकिशोरजी कोठारी, श्री. विनोदकुमारजी तोष्णीवाल, डॉ. राजकुमारजी हेडा, माजी मानद सचिव श्री. विमलकुमारजी गोयनका, ॲड. मोतीसिंहजी मोहता (विद्यमान अध्यक्ष), माजी तसेच विद्यमान वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. विजयकुमारजी तोष्णीवाल, माजी तसेच विद्यमान कनिष्ठ उपाध्यक्ष डॉ. रविंद्रजी जैन, माजी सहसचिव श्री. शरदजी चवरे, विद्यमान अध्यक्ष ॲड. मोतीसिंहजी मोहता, मानद सचिव श्री. पवनजी माहेश्वरी, सहसचिव इंजि. अभिजीतजी परांजपे आणि सर्व माजी व विद्यमान कार्यकारिणी सदस्य या सर्वांच्या प्रगल्भ नेतृत्वावर बी.जी.ई. संस्थेद्वारा संचालित श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाची भरभराट होत आहे.

महाविद्यालयाचा पन्नास वर्षात प्रगतीचा उंचावलेला आलेख न्याहाळतांना अभिमान वाटतो. या प्रगतीच्या मागे प्राध्यापकांचे, प्राचार्यांचे अपार कष्ट कारणीभूत आहेत. दर्जेदार गुणवत्तेचे शिक्षण देण्याची व्रतस्थवृत्ती प्राध्यापकांमध्ये आहे. महाविद्यालयासमोरील आव्हाने वाढलेली आहेत.

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात ३ डिजीटल क्लासरूमचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. रणजीतजी पाटील यांच्या शुभहस्ते दि. ८ सप्टेंबर २०१८ रोजी करण्यात आले. भौतिकशास्त्राच्या पहिल्या प्रयोगशाळेचे नुतनीकरण करण्यात आले, उद्घाटक होते आमदार श्री. रणधिरजी सावरकर आणि आमदार श्री. विप्लवजी बाजोरीया. भौतिकशास्त्राच्या दुसऱ्या प्रयोगशाळेचे उद्घाटन मानव संसाधन विकासमंत्री मा.ना.ॲड.संजयजी धोत्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. युनिर्व्हसिटी ग्रँटस कमिशन अंतर्गत श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात मुलींच्या वसतिगृहाचा दि. २३-७-२०१३ रोजी गुरूपौर्णिमेच्या मुहूर्तावर शुभारंभ करण्यात आला. आज येथे बाहेर गावच्या ५० विद्यार्थीनी राहून उच्च शिक्षित होत आहेत. वसतिगृहातील उर्वरित अन्न व इतर ऑरगॅनिक वेस्टपासून बायोगॅसजी निर्मिती करण्यात येत आहे. वसतिगृहात विविध शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक कार्यक्रम उत्साहाने साजरे केले जातात. ‘महिला सक्षमीकरण’ या विषयावर विद्यार्थीनींनी सादर केलेल्या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने वसतिगृहातील मुलींना दोनदा गौरवान्वित केलेले आहे. Save Energy अंतर्गत Solar Panel System चा वापर वसतिगृहात सुरु आहे.

आ. गोपीकिसनजी बाजोरीया, आ. गोवर्धनजी शर्मा, माजी आ. हरिदासजी भदे, अकोला महानगरपालिका आयुक्त श्री. संजयजी कापडणीस यांनीही भेट दिल्या आहेत. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधरजी चांदेकर, सहसंचालक, उच्चशिक्षण अमरावती विभाग डॉ. केशवजी तुपे यांनीही भेट देवून मार्गदर्शन केले आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गेल्या ५० वर्षात सेवानिवृत्त झालेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शाल व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. तसेच १९७० मधील काही माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी आमच्या महाविद्यालयाचे भूषण आहेत. सूक्ष्मजीवशास्त्र विषयात त्यांचा संशोधन, लेखन आणि अध्यापन कौशल्य उत्कृष्ठ राहीला. एक उत्तम प्रशासक म्हणून त्यांचा नावलौकिक आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापक आपला शैक्षणिक दर्जा उंचावत आहे. बहुतेक प्राध्यापकांनी आचार्य पदवी प्राप्त केलेली आहे व त्यांच्या मार्गदर्शनात बरेच विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत.

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाची पाच दशकांची यशस्वी वाटचाल म्हणजे विद्यार्थीमन, शिक्षकमन, समाजमन घडविण्याचा प्रवास. या विद्यामंदिराचा पाया रचणाऱ्या ज्ञात अज्ञात कर्मयोग्यांच्या स्मृतिंना विनम्र अभिवादन! महाविद्यालयाने भविष्यातही प्रगतीच्या नवनव्या वाटा शोधाव्यात व युगानुकुल अशा परिवर्तनाला सामोरे जात यशस्वीपणे हिरक महोत्सवाकडे वाटचाल करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.


शब्दांकन -

**प्रा. शैलजा विजय अंधारे**

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय,

अकोला


*******


R.L.T. COLLEGE OF SCIENCE AKOLA
AUDITORIUM